**अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई यांचे कार्यालय,**
३०२, वेक फिल्ड हाऊस, ३ रा मजला, ब्रिटानिया रेस्टोरंट जवळ, बॅलार्डइस्टेट, फोर्ट, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-२२६९४९८४/८५, Email:ccfmmumbai@gmail.com/dcfmangrovecell@gmail.com

**आदेश**

जा.क्र. कक्ष-3/जमीन/ 110 /सन 2025-26.
फोर्ट, मुंबई 400 001 दिनांक : 22/04 /2025.

**विषय : एकरेषिय (Linear) प्रकल्पांबाबत कामे सुरु करणेसाठी परवानगी (Working Permission) देण्याबाबत** (Diversion of 12.7808 Ha Forest (Mangrove) for the proposed construction of 5th and 6th lines between Borivali to Virar Stations by Mumbai Railway Vikas Corporation Ltd (MRVC).......

**वाचा:**

1. केंद्र शासनाचे पर्यावरण, वन आणि वातावरण बदलं, मंत्रालय, नागपूर यांचे पत्र क्र. FC-II/MH-212/2023-NGP/12508, दि.17.11.2023. (Stage- I).
2. प्रकल्प यंत्रणा (Mumbai Railway Vikas Corporation Ltd) यांचेकडील दि. 12/12/2023 रोजीचा पूर्तता अहवाल.
3. उप वनसंरक्षक, डहाणू यांचे कार्यालयाकडील पत्र क्र. अ/20/वसंअ/1411, दि.18.12.2023
4. महसूल व वनविभाग शासन निर्णय क्र. एस-10/2024 प्र.क्र.127/फ-3/ दि.02/08/2024.
5. मुंबई रेलवे विकास कॉर्पोरेशन लि. यांचेकडील पत्र क्र. MRVC/ MUTP/IIIA/ VI-VR/ 5th & 6th Line/Forest Clearance/Pt-II , Date- 10.02.2025
6. या कार्यालयाचे पत्र क्र. कक्ष-3/जमीन/2350, दि.25.02.2025.
7. विभागीय वन अधिकारी कांदळवन विभाग उत्तर कोकण यांचे कार्यालयाकडील पत्र क्र. कक्ष-9/जमीन/3634, दि.11.03.2025
8. पर्यावरण, वन व जलवायु परिवर्तन मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचे पत्र क्र.एफ नं. 11/306/2014, दि.07.05.2015.
9. शासन परिपत्रक क्र. एफएलडी-2015/प्र.क्र77/फ-10/ दि. 01/07/2015.

ज्याअर्थी, विषयांकित प्रस्तावावर उप वनसंरक्षक, डहाणू व विभागीय वन अधिकारी, कांदळवन विभाग उत्तर कोकण (तत्कालिन मुंबई कांदळवन संधारण घटक) यांचे मार्फत अनुक्रमे 7.655 हेक्टर व 5.1153 असे एकूण 12.7808 हेक्टर वनक्षेत्र प्रस्तावावर संस्करण करण्यात येत होते. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी Diversion of 12.7808 Ha Forest (Mangrove) for the proposed construction of 5th and 6th lines between Borivali to Virar Stations by Mumbai Railway Vikas Corporation Ltd (MRVC) बाबत प्रस्ताव विहीत मार्गाने केंद्रशासनाचे पर्यावरण, वन आणि वातावरण बदल, मंत्रालय क्षेत्रिय कार्यालय नागपूर यांचेकडे सादर केला होता.



Scanned with CamScanner

आणि ज्याअर्थी, उप वनसंरक्षक, डहाणू व विभागीय वन अधिकारी, कांदळवन विभाग उत्तर कोकण (तत्कालिन मुंबई कांदळवन संधारण घटक), मुख्य वनसंरक्षक (प्रा.) ठाणे आणि अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी प्रस्तावाची छानणी केल्यानंतर वन (संवर्धन) अधिनियम 1980 च्या तरतुदीनुसार 12.7808 हेक्टर कांदळवन वळतीकरण करणेकरीता केंद्र शासनास शिफारस केलेली होती.

आणि ज्याअर्थी, केंद्र शासनाने या प्रस्तावावर विचार करुन, अ.क्र. 1 अन्वये काही अटी शर्तीच्या अधिन राहून तत्वतः मंजुरी (In Principle approval) प्रदान केली आहे. केंद्रशासन तत्वतः मान्यता पत्रातील अटी शर्तीचा पूर्तता अहवाल संबंधित यंत्रणेने संदर्भ क्र.2 अन्वये उप वनसंरक्षक डहाणू यांचेकडे सादर केल्याचे निदर्शनास येत आहे. उप वनसंरक्षक, डहाणू यांनी संदर्भीय पत्र क्र.03 अन्वये केंद्र शासन तत्वतः मान्यता पत्रातील अटी शर्तीचा पूर्तता अहवाल मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) ठाणे यांचे कार्यालयास सादर केलेला आहे. दरम्यानच्या काळात, **संदर्भीय क्र. 04 अन्वये पारीत शासन निर्णयानुसार कांदळवन कक्षाचे अखत्यारित क्षेत्राचे पुर्ननियोजन होऊन कांदळवन विभाग दक्षिण व उत्तर कोकण अस्तित्वात आलेले आहेत. त्यानुसार पालघर जिल्हयातील कांदळवन व्याप्त क्षेत्र डहाणू वनविभागाकडून कांदळवन विभाग उत्तर कोकण विभागाकडे हस्तांतरीत करण्यात आलेले आहे.** परिणामी, आजमितीस उक्त नमूद डहाणू वनविभागाकडील प्रकल्प मागणी वनक्षेत्र (7.655 हेक्टर) कांदळवन विभाग उत्तर कोकण विभागाचे अखत्यारित आल्याने व प्रस्तुत प्रकल्प हे एकरेषिय (Linear) प्रवर्गात मोडत असल्याने संबंधित प्रकल्प यंत्रणेकडून वळतीकरण वनक्षेत्रात कामे करण्याकरीता संदर्भिय पत्र क्र. 05 अन्वये या कार्यालयास विनंती करण्यात आलेली होती. त्यास अनुलक्षून संदर्भिय पत्र क्र. 06 अन्वये सदर प्रकरणात Working Permission जारी करण्याकरीता स्वयंस्पष्ट अहवाल सादर करण्याकरीता विभागीय वन अधिकारी, कांदळवन विभाग- उत्तर कोकण यांना निर्देशित करण्यात आलेले होते. त्याप्रमाणे सदर प्रकल्पाबाबत Working Permission जारी करण्याकरीता विभागीय वन अधिकारी,कांदळवन विभाग- उत्तर कोकण यांचेकडील संदर्भीय पत्र क्र.07 अन्वये शिफारस करण्यात आलेली आहेत.

आणि ज्याअर्थी, केंद्रशासन पत्रातील अटी / शर्तीनुसार विविध प्रयोजनासाठी प्रकल्प प्राधिकरणाने खालीलप्रमाणे रक्कम कॅम्पा प्राधिकरणाकडे हस्तांतरीत केलेली आहे.

| अ.क्र | रक्कम हस्तातंरीत केल्याचा दिनांक | प्रयोजन | रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|
| 1 | 05/12/2023 | वनाचे प्रत्याशी मुल्य (Net Present Value) | 18361792/- | संबंधित यंत्रणेकडून सदर रक्कम कॅम्पा प्राधिकरणाकडे हस्तांतरीत |



Scanned with CamScanner

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 2 | | पर्यायी वनीकरण (CA) | 22880027/- | केलेली आहे. |
| 3 | | वन्यजीव संवर्धन आराखडा | 1391360/- | |
| 4 | | Erection of Cement Pillar | 701682/- | |
| | | **एकूण (A)** | 43334861/- | |
| 1 | 05/12/2023 | वृक्षतोडीकरीता आवश्यक रक्कम | 2038338/- | संबंधित यंत्रणेकडून सदर रक्कम विभागीय वन अधिकारी, कांदळवन विभाग- उत्तर कोकण यांचेकडे जमा करण्यात आलेली आहे. |
| | | **एकूण (B)** | 2038338/- | |
| | | **एकूण एकंदर (A+B)** | 45373199/- | |

आणि ज्याअर्थी, केंद्रशासन तत्वतः मान्यता पत्रातील अट क्र.5 ला अनुसरुन प्रस्तावित वनक्षेत्रात कमीत कमी वृक्षतोड होईल याची दक्षता प्रकल्प यंत्रणेने घेणे आवश्यक आहे. तसेच सदर वृक्षतोड विभागीय वन अधिकारी, कांदळवन विभाग उत्तर कोकण यांचे देखरेखेखाली होणे अपेक्षित आहे. प्रकल्प यंत्रणेने वृक्षनिष्कासनासाठी विभागीय वन अधिकारी, कांदळवन विभाग- उत्तर कोकण यांचेकडे रु.2038338/- इतकी रक्कम DD No.440030 दि. 05/12/2023 द्वारे जमा केलेली आहे.

आणि ज्याअर्थी, केंद्रशासन तत्वतः मान्यता पत्रातील अट क्र. 7 ला अनुसरुन प्रकल्प यंत्रणेने जिल्हाधिकारी, पालघर, मुंबई उपनगर व ठाणे यांचेकडील खालीलप्रमाणे वन हक्क कायदा, 2006 अंतर्गत प्रमाणपत्रे सादर करण्यात आलेली आहेत.

| Sr. No | Village | Area required in Ha. | FRA Status | Issued Competent Authority |
|---|---|---|---|---|
| 1. | Dahisar **(Railway Land)** | 3.6879 | No rights recognized | Collector Mumbai Suburban letter No.C/Desk-21/FRA/WS-109/23, Dtd.10.04.2025 |
| 2 | Penkarpada Dist. Thane **(Railway Land)** | 1.4274 | No right affected | Collector Thane Letter no. RB DESK IV/FRA/NOC CR 05/2023, Dtd.23.08.2023 |
| 3. | Umele, Tal. Vasai S.No/Gut No.118 **(Mangrove land in Possession of Private person.)** | 7.6655 | FRA is not applicable for said land | जिल्हाधिकारी, पालघर यांचेकडील पत्र क्र. महसूल/वनहक्क प्रमाणपत्र/कावि-94/ 2024, दि.19.03.2024 |
| | Total | 12.7808 | - | - |

आणि ज्याअर्थी, केंद्रशासन तत्वतः मान्यता पत्रातील अट क्र. 08 ला अनुसरुन प्रकल्प प्राधिकरणाने वन्यजीव संरक्षण अधिनियम, 1972 आणि प्राण्यांना क्रूरतेने वागवण्यास प्रतिबंध करण्याबाबत अधिनियम 1960



Scanned with CamScanner

चे अनुषंगाने संबधित उप वनसंरक्षक यांचे सल्लामसलत करुन वन्यजीवांचे पारंपारिक रस्त्यावरील मार्गक्रमण सुकर होणेकरीता उचित Guided Cross Passage Structure उपलब्ध करणे आवश्यक आहे.

आणि ज्याअर्थी, केंद्र शासन तत्वतः मान्यता पत्रातील अट क्र. 10 ला अनुसरून प्रकल्प यंत्रणेने Site Specific Wildlife Conservation Plan बाबत पूर्तता करण्याकरीता रक्कम रु.1391360/- कॅम्पा खात्यात जमा केलेले आहेत.

आणि ज्याअर्थी, केंद्र शासन तत्वतः मान्यता पत्रातील अट क्र. 12 ला अनुसरून प्रकल्प यंत्रणेने केंद्र शासनाकडील दि. 06.10.2023 रोजी जारी केलेल्या निर्देशानुसार सदर प्रकल्पास Environment Clerance and CRZ Clearance हे क्षमापित (Exempted) करण्यात आलेले असल्याचे कळविले आहे.

आणि ज्याअर्थी, केंद्रशासन तत्वतः मान्यता पत्रातील अट क्र. 16 ला अनुसरुन प्रकल्प प्राधिकरणाने उप वनसंरक्षक यांचे सूचनानुसार उक्त नमूद वळतीकरण झालेल्या क्षेत्राचे सिंमाकन करणे आवश्यक आहे. करीता प्रकल्प यंत्रणेने सदर अटीचे पूर्तता करण्याकरीता रक्कम रु.701682/- कॅम्पा खात्यात जमा केलेले आहेत.

आणि ज्याअर्थी, सदर प्रस्तावात कांदळवन वृक्षांची तोड असल्यामुळे प्रकल्प प्राधिकरणाने मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल केलेले Writ Petition No. 35560 of 2023 मध्ये मा. उच्च न्यायालयाने दिनांक 30.08.2024 रोजी कांदळवन वृक्षांच्या तोडीस काही अटी शर्तीच्या अधिन राहून मान्यता दिली आहे.

आणि ज्याअर्थी, वरील संदर्भीय क्र. 08 अन्वये एकरेषीय प्रकल्पा संदर्भात केंद्र शासनाने मार्गदर्शक सूचना जारी केलेल्या आहेत. तसेच राज्य शासनाने वरील संदर्भीय क्र. 09 अन्वये वन (संवर्धन) अधिनियम 1980 अंतर्गत एकरेषीय प्रकल्पांना (Linear Projects) तत्वतः मान्यता मिळाल्यानंतर काही अटींच्या अधिन राहून काम सुरु करण्यास व झाडे तोडण्यास परवानगी देणे बाबत सर्वसाधारण मान्यता दिली आहे.

आणि ज्याअर्थी, वन (संरक्षण एवंम संवर्धन) अधिनियम 1980 अंतर्गत नवीन रस्ते, अस्तित्वात असलेले महामार्गाचे रुंदीकरण, ट्रान्समिशन प्रा., पाण्याची पाईप प्रा., ऑप्टीकल फायबर केबल प्रा., रेल्वे प्रा. इत्यादी एकरेषिय (Linear) प्रकल्पांना तत्वतः मान्यता दिल्यानंतर प्रकल्पांचे काम जलद गतीने सुरु करून सुविधा उपलब्ध होण्याच्या दृष्टीने सदर तत्वतः मान्यता दिलेल्या पत्रातील आवश्यक अटींची पूर्तता प्रकल्प यंत्रणेने केल्यानंतर प्रकल्पांतर्गत वन जमिनीवरील झाडे तोडण्यास व कामे सुरु करणेसाठी परवानगी देण्याकरिता राज्य शासनाचे वरील अ.क्र. 09 चे परिपत्रकातील अटीस अधीन राहून अशी परवानगी देणेसाठी मुख्य वनसंरक्षक (प्रा.) यांना प्राधिकृत केले आहे.



Scanned with CamScanner

म्हणून आता याव्दारे असे निर्देश देण्यात येत आहे की, सदरचा प्रकल्प एकरेषीय असल्यामुळे व याबाबत केंद्रशासनाच्या मार्गदर्शक सूचना अस्तित्वात असल्यामुळे प्रकल्प प्राधिकरण म्हणजेच Mumbai Railway Vikas Corporation Ltd (MRVC यांच्या Diversion of 12.7808 Ha Forest (Mangrove) for the proposed construction of 5th and 6th lines between Borivali to Virar Stations by Mumbai Railway Vikas Corporation Ltd (MRVC) वनजमिन मागणी प्रस्तावास खाली दिलेल्या अनुसूची मध्ये नमूद केलेल्या क्षेत्रात कामे सुरु करणेस परवानगी (Working Permission) देण्यात येत आहे. ही परवानगी खालील अटी शर्ती पूर्ततेच्या अधिन राहून देण्यात येत आहे :-

1) सदर परवानगी प्रकल्पांतर्गत प्रस्तावित वळतेकरण क्षेत्रात कामे सुरु करणे व झाडे तोडण्यापुरती मर्यादित आहे. आणि सदर परवानगी एक वर्षासाठीच म्हणजेच दि. 22.04.2026 पर्यंतच वैध (Valid) राहील म्हणजेच दिनांक 23.04.2026 पासून आपोआप रद्द झालेचे समजण्यात येईल. सदर परवानगी जारी झाल्यानंतर एक वर्षाचे कालावधीत प्रकल्प यंत्रणेस केंद्र शासन तत्वतः व अंतीम मान्यता पत्रातील सर्व अटी व शर्तीची पूर्तता करून राज्य शासनाकडून वळतीकरण आदेश प्राप्त करून घेणे आवश्यक आहे. सदर परवानगीस मुदतवाढ देणे या कार्यालयाच्या अधिकारात येत नसल्याने एक वर्षाचा कालावधी उलटून गेल्यानंतर प्रस्तावांतर्गत क्षेत्रात काम सुरु ठेवण्यासाठी या कार्यालयास पत्रव्यवहार प्रकल्प यंत्रणेस करता येणार नाही.

2) केंद्रशासन तत्वतः मान्यता पत्रातील अट क्र. 5 ला अनुसरुन प्रस्तावित वनक्षेत्रात कमीत कमी वृक्षतोड होईल याची दक्षता प्रकल्प यंत्रणेने घेणे आवश्यक आहे. प्रकल्प यंत्रणेने खालील नमूद क्षेत्रात वृक्षनिष्कासनासाठी विभागीय वन अधिकारी, कांदळवन विभाग- उत्तर कोकण यांचेकडे रु.2038338/- (DD No.440030) दि. 05/12/2023 द्वारे जमा केलेली आहे.

| S. NO. | Survey Number and Village | Area in Hector | Trees to be felled | | Total |
|---|---|---|---|---|---|
| | | | Mangroves | others | |
| 1. | Dahisar<br>**(Railway Land)** | 3.6879 | 1465 | 0 | 1465 |
| 2. | Penkarpada Dist. Thane<br>**(Railway Land)** | 1.4274 | 492 | 22 | 514 |
| 3 | Umele, Tal. Vasai<br>S.No/Gut No.118<br>**(Mangrove land in Possession of Private person.)** | 7.6655 | 633 | - | 633 |
| | **Total** | 12.7808 | 2590 | 22 | 2612 |

E:\FCA\5th and 6th lines between Borivali to Virar Station (12.78 ha).docx

Scanned with CamScanner

उक्त नमूद रक्कम वरिल प्रयोजनार्थ विभागीय वनअधिकारी कांदळवन विभाग उत्तर कोकण यांचेकडे जमा असून, सदर रक्कमेचा विनियोग करुन उचित कार्यवाही करण्यात यावी.

3) केंद्रशासन तत्वतः मान्यता पत्रातील अट क्र. 7 ला अनुसरुन प्रकल्प यंत्रणेने जिल्हाधिकारी, पालघर, मुंबई उपनगर व ठाणे यांचेकडील वन हक्क कायदा, 2006 अंतर्गत प्रमाणपत्रे सादर केलेली आहेत. त्यांचे पुनश्च अवलोकन आपले स्तरावरुन करण्यात यावे.

4) केंद्रशासन तत्वतः मान्यता पत्रातील अट क्र. 08 ला अनुसरुन प्रकल्प प्राधिकरणाने वन्यजीव संरक्षण अधिनियम, 1972 आणि प्राण्यांना क्रूरतेने वागवण्यास प्रतिबंध करण्याबाबत अधिनियम 1960 चे अनुषंगाने संबधित उप वनसंरक्षक यांचे सल्लामसलत करुन वन्यजीवांचे पारंपारिक रस्त्यावरील मार्गक्रमण सुकर होणेकरीता उचित Guided Cross Passage Structure उपलब्ध करणे आवश्यक आहे. तरी सदर अटीचे अनुषंगाने उचित कार्यवाही करण्यात यावी.

5) केंद्र शासन तत्वतः मान्यता पत्रातील अट क्र. 10 ला अनुसरून प्रकल्प यंत्रणेने Site Specific Wildlife Conservation Plan बाबत पूर्तता करण्याकरीता रक्कम रु.1391360/- कॅम्पा खात्यात जमा केलेले आहेत. सदर Site Specific Wildlife Conservation Plan बाबत पूर्तता करण्याची जबाबदारी विभागीय वनअधिकारी कांदळवन विभाग उत्तर कोकण यांची राहील.

6) केंद्र शासन तत्वतः मान्यता पत्रातील अट क्र. 12 ला अनुसरून प्रकल्प यंत्रणेने केंद्र शासनाकडील दि. 06.10.2023 रोजी जारी केलेल्या निर्देशानुसार सदर प्रकल्पास Environment Clerance and CRZ Clearance हे क्षमापित (Exempted) करण्यात आलेले असल्याचे कळविले आहे. याबाबत आपले स्तरावरुन पुनश्च खात्री करण्यात यावी.

7) केंद्रशासन तत्वतः मान्यता पत्रातील अट क्र. 16 ला अनुसरुन प्रकल्प प्राधिकरणाने उप वनसंरक्षक यांचे सूचनानुसार उक्त नमूद वळतीकरण झालेल्या क्षेत्राचे सिंमाकन करणे आवश्यक आहे. करीता प्रकल्प यंत्रणेने सदर अटीचे पूर्तता करण्याकरीता रक्कम रु.701682/- कॅम्पा खात्यात जमा केलेले आहेत. याबाबत उचित कार्यवाही करण्यात यावी व तसे या कार्यालयास अवगत करण्यात यावे.

8) सदर प्रस्तावात कांदळवन वृक्षांची तोड असल्यामुळे प्रकल्प प्राधिकरणाने मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल केलेले Writ Petition No. 35560 of 2023 मध्ये मा. उच्च न्यायालयाने दिनांक 30.08.2024 रोजी कांदळवन वृक्षांच्या तोडीस काही अटी शर्तीच्या अधिन राहून मान्यता दिली आहे. सबब सदर



Scanned with CamScanner

आदेशात नमूद संख्येपेक्षा अधिक कांदळवन वृक्षांची तोड होणार नाही याची दक्षता घेण्याची जबाबदारी संबंधीत प्रकल्प यंत्रणा आणि विभागीय वनअधिकारी कांदळवन विभाग उत्तर कोकण यांची राहील. तसेच मा. उच्च न्यायायल, मुंबई यांनी सदर आदेशात विहित केलेल्या अटी व शर्तीबाबत पूर्तता झाली असल्याची खात्री करुन अहवाल या कार्यालयास सादर करण्यात यावा.

9) वन (संरक्षण एवंम संवर्धन) अधिनियम 1980 अंतर्गत केंद्र शासन तत्वतः मान्यता मिळालेल्या पत्रातील अटींची पुर्तता प्रकल्प प्राधिकरणाकडून काटेकोरपणे होईल याबाबत दक्षता घ्यावी. प्रकल्प यंत्रणा सर्व अटींचे तंतोतंत पालन करेल याची विभागीय वनअधिकारी, कांदळवन विभाग उत्तर कोकण हे खात्री करतील. आणि वेळोवेळी याबाबतचा अहवाल अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष मुंबई यांना सादर करतील.

10) प्रकल्प यंत्रणेने प्रस्तावीत क्षेत्रात काम सुरु करण्यापूर्वी, विभागीय वनअधिकारी, कांदळवन विभाग उत्तर कोकण यांना कळविणे आवश्यक आहे. विभागीय वनअधिकारी, कांदळवन विभाग उत्तर कोकण यांनी कामे सुरु असतांना प्रस्तावित वन जमीनीवर वनभंग झाला आहे का ते पाहणे, वनभंग झाल्याचे निर्दशनास आल्यास केंद्र शासनाचे पर्यावरण, वन व जलवायु मंत्रालय, नवी दिल्ली यांचेकडील Hand Book मधील परिच्छेद क्र.1.21 अनुसार कारवाई करतील.

11) प्रकल्पामुळे प्रकल्पांतर्गत क्षेत्रातील पक्षी / वन्यजीवांचे वस्तीस्थान नष्ट न होता अबाधित राहण्याकरीता काही उपाययोजना विभागीय वनअधिकारी कांदळवन विभाग उत्तर कोकण यांनी सुचविल्यास त्याबाबत आवश्यक ती उपाययोजना प्रकल्प यंत्रणा करेल.

12) प्रकल्पांतर्गत वनक्षेत्रात प्रकल्प प्राधिकरणाकडून कामे करताना वन संपदेचे नुकसान होणार नाही,याची दक्षता घेणे आवश्यक आहे.

13) विभागीय वनअधिकारी, कांदळवन विभाग उत्तर कोकण यांनी केंद्रशासनाकडील दि. 17/11/2023 अन्वये पारीत तत्वतः मान्यता पत्रातील बंधनकारक अटी व सदर अटीचे पालन करणेकरीता प्रकल्प यंत्रणेने दिलेले बंधपत्रातील मुद्दयांबाबत प्रकल्प प्राधिकरणाकडून विहित कालावधीत पूर्तता केली जाईल याबाबत विभागीय वनअधिकारी, कांदळवन विभाग उत्तर कोकण यांची जबाबदारी राहील.

14) प्रस्तुत प्रस्तावाअंतर्गत NPV, CA, वृक्ष कटाईबाबत प्रकल्प यंत्रणेनी संबंधीत सदरी जमा केलेली रक्कमेबाबत प्रचलीत केंद्र शासनाकडील सुचनानुसार व स्थानिक वनक्षेत्रातील परिस्थितीनुसार रक्कमेत



Scanned with CamScanner

वाढ होत असल्यास त्याबाबत अतिरिक्त रक्कम प्रकल्प यंत्रणेने अदा करणेकरीता हमीपत्र (Undertaking) सादर करण्यात यावे.

उपरोक्त अटींपैकी कोणत्याही अटींचे अनुपालन न केल्यास (Non-compliance) विभागीय वनअधिकारी कांदळवन विभाग उत्तर कोकण यांनी वन (संवर्धन) अधिनियम 1980 अंतर्गत केंद्र शासनाचे पर्यावरण, वन व जलवायु मंत्रालय, नवी दिल्ली यांचेकडील Hand Book मधील परिच्छेद क्र. 1.21 अनुसार अहवाल सादर करतील.

**अनुसुची**

| **Village** | Taluka | **Survey No.** | **Area (in Ha.)** | **Legal Status** |
|---|---|---|---|---|
| Dahisar | Borivali | Un-surveyed Ra Land | 3.6879 | Un- notified Mangrove Forest (Railway land) |
| Penpada | Thane | | 1.4274 | |
| Umele | Vasai | 118(Railway land) | 7.6655 | Mangrove land in Possession of Private person. |
| | | **Total** | **12.7808** | |

सदर आदेशाची प्रत स्थानिक संस्था, पंचायत, नगरपालिका, नगरपरिषद आणि संबंधित शासकीय कार्यालयाचे प्रमुख यांना पाठविण्यात यावी. तसेच सदर आदेश त्यांच्या कार्यालयातील सूचना फलकावर, सर्वसामान्य जनतेच्या माहितीसाठी प्रदर्शित करावी. सदर आदेश महाराष्ट्र शासन वनविभागाचे www.mahaforest.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात येत आहे.

सहपत्र : वरीलप्रमाणे
(सर्व संदर्भीय पत्रे)

(एस व्ही. रामाराव)
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक,
कांदळवन कक्ष, मुंबई.

अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई
सत्यमेव जयते

प्रति,

विभागीय वनअधिकारी,
कांदळवन विभाग, उत्तर कोकण.

प्रतिलिपी : अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी महाराष्ट्र राज्य नागपूर यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी सविनय सादर.

प्रतिलिपी : मुख्य वनसंरक्षक (प्रा.) ठाणे यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी सस्नेह अग्रेषित.

प्रतिलिपी : उप वनसंरक्षक, डहाणू यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीकरीता अग्रेषित.

प्रतिलिपी : मुंबई रेल्वे विकास कॉर्पोरेशन लि. यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित.

E:\FCA\5th and 6th lines between Borivali to Virar Station (12.78 ha).docx

Scanned with CamScanner